## रंग वारीचे...

*अनाथांचा नाथ भक्तांचा कैवारी । पुराणी ती थोरी ऐकीयेली ।।धृ।।*
*ऐकोनीया कीर्ति आलो तुझ्यापाशी । निवारी दुःखासी कैसी राया ।।१।।*
*त्रितापे तापलो दुःखे आळलो । कासावीस झालो दद्यासिंधु ।।२।।*
*नामा म्हणे देवा नको पाहू अंत । उद्धरावे मज पांडुरंग ।।२।।*



# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १२८ वा ❑ मंगळवार दि.१ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

# सरकारचा उद्दामपणा आणि बालिशपणा!


– प्रा डॉ सुधीर अग्रवाल


**ज्योतिर्मय 🕮 साहित्य**

आखिरकार फडणवीस सरकारने इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीवरून विरोधी पक्षांनी भाजपची कोंडी केल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यात त्रिभाषा सूत्र लागू करण्याच्या दोन शासकीय आदेशांना स्थगिती देण्यात येत असल्याची घोषणा रविवारी केली. विरोधकांचा दबाव तसेच आगामी महानगरपालिका निवडणूक लक्षात घेता भाजपने हिंदीच्या मुद्द्यावर माघार घेतली. त्रिभाषेच्या संदर्भात धोरण ठरविण्यासाठी नवीन समिती स्थापन करण्यात आल्याने पुढील शैक्षणिक वर्षापासूनच नवीन धोरण अमलात आणले जाईल असाच एकूण रागरंग आहे.

इयत्ता पाहिली ते पाचवी  पर्यंतच्या मुलांना हिंदी सक्तीचा फडणवीस सरकारचा निर्णय उद्दामपणाचा व बालिशपणाचा होता.. आधी सक्तीचा निर्णय ,नंतर अनिवाय व विरोध होताच ऐच्छिक असे शासन आदेश काढत सरकारने आतताई पणा दाखवत आपल्या उद्दामपणाचा परिचय दिला.

मुंबई महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर व केंद्र सरकारच्या आग्रहाखातर राज्य सरकारने हिंदी सक्तीचा निर्णय निर्गमित केला..या मध्यातून मुंबई हिंदी गुजराती भाषिकांना आपलेसे करून घेण्याचा उद्देश राज्य सरकारचा असावा,असा अर्थ काढण्यात येतो,हा अंदाज बहुतांश खरा देखील आहे. कोणत्याही परिस्थितीत मुंबई महानगरपालिका जिंकायची ही मनीषा ठेऊनच हिंदी सक्तीला दुजोरा सरकारने दिला..मात्र सरकारचा हा निर्णय मुंबई साठीच नव्हे तर अख्या महाराष्ट्रासाठी नुकसानदायक ठरणारा राहू शकतो. व ज्या मराठी उद्देशाला अनुसरून मनसे व शिवसेना अस्तित्वात आली त्या उद्देशाला कुठेतरी हरताळ फासल्या जात आहे..म्हणून दोन्ही हिंदी भाषेच्या सक्ती विरोधात एकत्र आले व या आंदोलनात सर्व पक्ष जुडले. राज्यातील संपूर्ण जनतेचा व राजकीय पक्षांचा विरोध बघता फडणवीस सरकारने दोन पाऊले मागे घेतले.

हिंदी सक्तीच्या विरोधात मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी येत्या शनिवारी मुंबईत पक्षविरहित मोर्चा आयोजित केला होता. शिवसेना (ठाकरे), कॉंग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार), मार्क्सवादी कम्युनिस्ट, वंचित बहुजन आघाडी अशा विविध राजकीय पक्षांनी या मोर्चाला पाठिंबा जाहीर केला होता. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत हिंदी सक्तीचा मुद्दा भाजपला त्रासदायक ठरू शकला असता. त्यातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही हिंदी सक्तीच्या विरोधात उघडपणे भूमिका मांडली होती. शिवसेना एकनाथ शिंदे गटातही तीव्र प्रतिक्रिया उमटली होती. हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर भाजप एकाकी पडल्याचे चित्र होते. यामुळेच त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबत १६ एप्रिल आणि १७ जून रोजी काढण्यात आलेले दोन्ही शासकीय आदेश रद्द करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत केली.

राज्यभरातून विरोध झाल्यानंतर आता राज्य सरकारने त्रिभाषा सूत्राअंतर्गत इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा विषय लागू करण्याचे दोन्ही शासन निर्णय रद्द केले आहेत. सरकारने शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने एक समिती स्थापन करण्याचीही घोषणा सरकारने केली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतरच आता त्रिभाषा सूत्राअंतर्गत कोणत्या भाषेचा समावेश करायचा? हे ठरवले जाणार आहे. एकंदरीत सरकारच्या आततांईपणा व बालिशपणामुळे सरकार तोंडघशी पडले..महत्त्वपूर्ण निर्णय घेताना विरोधी पक्ष व लोकांची मते देखील सरकारने जाणून घेतली पाहिजे..बहुमताच्या आधारावर कोणतेही निर्णय घेऊ नये,हाच या निर्णयाचा अर्थ आहे.हे सरकारला कधी समजेल?

# तो चि माझा सखा पांडुरंग....

**ज्योतिर्मय 🕮 साहित्य**

अहो अहो ! ऐकलंत का?

काय बाई तुम्ही ऐकतच नाही! कसं होणार माझं ? अहो मुलं पाचसहा दिवसात पोहोचतील घरी ! किती किती तयारी करायची आहे ? घर स्वच्छ करायचे, सगळ्या खोल्या नीटनेटक्या करायच्या... वाणसामान आणायचे, भरायचे... लेकरं चालून चालून दमतील... त्यांना गोडधोड करून घालायचेआहे... निवृत्ती, ज्ञाना, सोपान, मुक्ता, एकनाथ, नामा, तुकोबा, चोखा, गोरोबा सगळी सगळीच येणारं... मुलं आली की माझं घर कसं भरून जाईल...

काढा ते कटेवरचे हात आणि मदत करा बाई मला... केवढी काम ! एवढा मोठा कामाचा डोंगर उपसायचा आहे... तुमचं आपलं बरं असते... नुसतं मंद मंद हसलं की मंडळींच्या पोटात आनंद मावत नाही ! विचारायची सोय नाही... माझ्याकडे बघून हसले या कल्पनेनेच भारावून जाणारी आपली पोरं...

काही कधीच तक्रार करत नाहीत... जेवायच्या आवडीनिवडी नाही, पानात जे पडेल ते प्रसाद म्हणून खायचे... जिथे जागा मिळेल ते झोपणारी, जागा मिळेल तिथे अंघोळ करायची, कपडे नुसते पिळले की झालं... कशाकश्याची तक्रार नाही....

मला काळजी वाटते लेकरांची ! मुक्ताई तर किती लांबून चालत येणार ! तिला चोळी बांगडी म्हणून काही तरी द्यायला हवं बरं का !



माझ्या मनात ज्ञानाला मांडे करून घालायचे आहेत, निवृत्तीला खीर करून घालीन म्हणते... तुका माझा अगदीच साधाभोळा ! त्याच्या आवडीनिवडी नाहीतच, पण त्याला पण काहीतरी छान करून घालेनचं !!

आधी राहताच मुलं चार नाही तर पाच दिवस... सगळ्यांना जे हवं ते करून घालावं अशी माझी खुप इच्छा आहे... चालून चालून घालून पाय दुखत असतील पोरांचे... तेल लावून देईन म्हणते... मुलं आली की घर कसं भरून जातं... इकडं तिकडं बघायला पण सवड नाही मिळणार... म्हणून आधीच तयारी करून ठेवावी म्हणजे त्यांच्याशी जरा बोलता, जवळ बसता येईल... गुजगोष्टी करता येतील...


मंद मंद हासत विठूमाऊली म्हणाली नको करू इतकी काळजी ! मुलं आपली आहेतच गुणी ! येतील, बसतील, बोलतील परत आपल्या वाटेने निघून जातील... वाटेत काळजी घ्यायला मी असतोच की तयार ! काही काही अडचण नाही येणारं मुलांना !

एक एक करत सगळी मुलं घरी सुखरूप पोहचली. सगळ्यांच्या आनंदाला उधाण आले होते. आईबापाची भेट होणार म्हणून सगळीच मुले खुप आनंदीत, सद्गदित झालेली. चालत चालत आलेली मुलं... एकाच्या पण चेहऱ्यावर दमलेला, शिणलेला भाव नव्हता. दिसत होता तो आनंद आणि आनंदच.., हेच तर मंदमंद हसणाऱ्या चेहऱ्यावरच गुपित होते. आपण मुलांची उगाचच काळजी करतोय... काळजी घेणारा पिता परमेश्वर तो आहे... हे ध्यानात येताच.... लिंबलोण, तुकडा ओवाळून टाकायला रूक्मिणी माता लगबगीने पुढे गेल्या...

।। रामकृष्ण हरी।।


रंग वारीचे...

©सौ आरती राजाराम परिचारक.
पंढरपूर.




# भारत-क्रोएशिया सांस्कृतिक संबंधांचा नवा अध्याय !

**ज्योतिर्मय 🕮 साहित्य**

क्रोएशिया आणि भारत या उभय देशांमध्ये प्राचीन सांस्कृतिक संबंधांना आता नवा राजकीय उजाळा मिळाला आहे. कारण १९९० या दशकात स्थापन झालेल्या या स्वतंत्र प्रजासत्ताक देशाला भेट देणारे नरेंद्र मोदी हे पहिले भारतीय पंतप्रधान आहेत. उभय देशांमधील सामंजस्य करार आणि अर्थपूर्ण देवाण-घेवाण यामुळे या भेटीला विशेष महत्त्व आहे. तसे पाहिले तर क्रोएशिया या देशाचा इतिहास प्राचीन मध्ययुगीन काळापासून संपन्न आणि समृद्ध आहे. या देशातील अभ्यासकांनी संस्कृत भाषेचा अभ्यास करून मोलाची भर टाकली आहे तसेच वर्तमान काळातसुद्धा या देशातील विद्यापीठातून प्राच्य विद्येचे संशोधन मोठ्या प्रमाणात केले जात आहे. आता आधुनिक काळात विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी उद्योग, संरक्षण यासारख्या अनेक महत्त्वाच्या क्षेत्रात दोन्ही राष्ट्रे सहकार्यासाठी वचनबद्ध झाली आहेत. या दोन्ही राष्ट्रांच्या परस्परपूरक मैत्रीचा आणि आर्थिक सहकार्याचा नवा सेतू पंतप्रधान मोदी यांच्या क्रोएशिया भेटीमुळे बांधला गेला आहे.

**वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान**

क्रोएशियन प्रजासत्ताकाचे युरोपच्या भू-राजनीतिक व्यवस्थेत महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान आहे. या देशाभोवती असलेल्या अन्य युरोपियन देशांची रचना पाहिल्यास असे दिसते की, युरोपमधील ॲड्रीयाटिक समुद्राच्या उंबरठ्यावर हा देश उभा आहे. त्याच्या वायव्येस स्लोवाकिया, ईशान्येस हंगेरी, पूर्वेस सरबिया,अग्नेय दिशेला बोसनिया आणि हरजगोनिया तसेच मोंटे निग्रो हे देश आहेत आणि पश्चिमेस इटलीच्या सीमासुद्धा समाविष्ट आहेत. या देशाची राजधानी तेथील सर्वात मोठे शहर गागरेही आहे. या प्रदेशात सुमारे २० जिल्ह्यांचा समावेश आहे. नागरी वस्ती आणि घनदाट लोकसंख्येमुळे या प्रदेशाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

प्राचीन काळात सहाव्या शतकापासून या देशाचा सलग इतिहास उपलब्ध होतो. तेथे प्रारंभी रोमन संस्कृतीचा ठसा पाहावयास मिळतो. त्यानंतर मध्ययुगात अनेक उलथापालथी होऊन या देशाने आपले अस्तित्व कायम टिकविले आहे आणि वाढविले आहे. क्रोएशिया हा शब्द क्रोयटस लॅटिन शब्दापासून बनला आहे. क्रोएशिया शब्दाचा अर्थ रक्षक किंवा संरक्षक असा होतो. या नावाप्रमाणे या देशाचा इतिहाससुद्धा तेवढाच अर्थपूर्ण आणि सुसंगत असा आहे.

या देशाची लोकसंख्या ३.८७ दशलक्ष असून, पर्यटनदृष्ट्या अत्यंत विकसित अन् संपन्न असा हा देश आहे. भारतीय लोकसुद्धा या देशास पर्यटनासाठी मोठ्या संख्येने हजेरी लावतात. शेती, उद्योग,शिक्षण आणि प्रगत तंत्रज्ञान या क्षेत्रांतील प्रगतीमुळे या देशाचे दरडोई उत्पन्न अधिक आहे तसेच मानवनिर्देशांकही उच्च आहे. त्यामुळे या देशाशी व्यापार उदीम आणि शैक्षणिक आदान-प्रदानास मोठी संधी आहे, हे लक्षात घेऊन पंतप्रधान मोदी यांनी उच्चस्तरीय शिष्टमंडळासह तेथील नेत्यांची भेट घेऊन या देशाच्या आर्थिक संपन्नतेचा आणि समृद्धतेचा भारताच्या मैत्रीमुळे कसा लाभ होऊ शकेल, याची गणिते उत्तम प्रकारे मांडली आहेत.

**क्रोएशिया भेटीचे फलित**

क्रोएशियाला भेट देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताचे पहिले पंतप्रधान आहेत. त्यांच्या या भेटीमुळे सर्वात मोठी फलश्रुती काय असेल, तर उभय देशातील सांस्कृतिक संबंध पुनश्च भक्कम झाले आहेत, ही होय. क्रोएशियाचे पंतप्रधान अंधरेज प्लेनकोविक यांनी काही शतकापूर्वी वेझदिन यांनी संपादन केलेल्या संस्कृत व्याकरणाची पुनरमुद्रित प्रत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सुपूर्द केली, हा एक अनमोल ठेवा आहे. दोन्ही देशातील नेत्यांनी आर्थिक सहकार्य व सांस्कृतिक संबंध वाढविण्यावर सर्वअंगाने चर्चा केली आणि विविध क्षेत्रांतील ४ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. भारत आणि क्रोएशिया यांच्यातील राजकीय, आर्थिक,





सांस्कृतिक संबंधांमधील एक महत्त्वाचा सुवर्णक्षण त्यामुळे नोंदविण्यात आला आहे. द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी ही भेट फलदायी ठरली आहे. गागरे या शहराला पंतप्रधानांनी पहिल्यांदा भेट दिली आणि क्रोएशियन पंतप्रधानांनी भेट दिलेले दुर्मिळ संस्कृत व्याकरण हे एक प्रतिकात्मक असे महत्त्वाचे पुस्तक आहे. कारण त्यामुळे दोन्ही देशातील सांस्कृतिक संबंधांची शतकानुशतके जुन्या परंपरांचे आदान-प्रदानाचे प्रतीक म्हणून त्याकडे पाहिले जात आहे. वेजातीन या लॅटिन पंडिताने क्रोएशियामध्ये लॅटिन भाषेत लिहिलेले हे पहिले छापिल संस्कृत व्याकरण आहे. ते १७९० यावर्षी लिहिले गेले. क्रोएशियन विद्वान आणि मिशनरी फिलिप वेजदिन यांनी भारताला भेट देऊन संस्कृत भाषेचा सखोल अभ्यास केला आणि हे व्याकरण प्रकाशित केले होते. क्रोएशिया आणि भारत यांच्यातील सांस्कृतिक संबंधांचा एक सुवर्ण धागा म्हणून या व्याकरणाकडे पाहिले जात आहे. क्रोएशियन राजदूत सिनिसा ग्रगिक यांनी लिहिलेले ‘‘क्रोएशिया अँड इंडिया : बायलॅटरल नेविगेटर फोर डिप्लोमॅट्स अँड बिझनेस‘‘ हा ग्रंथ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना क्रोएशियाच्या पंतप्रधानांनी भेट दिला. या ग्रंथामध्ये दोन्ही देशाच्या संबंधांबाबत, भविष्यकालीन संधींबाबत अभ्यास करण्यात आला आहे. किंबहुना हा ग्रंथ म्हणजे दोन्ही देशातील मैत्रीचा रोडमॅप म्हटला पाहिजे.

**महत्त्वाचे बिंदू कोणते?**

उभय देशांमधील मैत्री संबंध पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी झालेल्या सामंजस्य करारांचे आगळे-वेगळे महत्त्व आहे. विशेषतः या करारानुसार दोन्ही नेत्यांनी व्यापार, गुंतवणूक तसेच पर्यटन आणि आर्थिक वाणिज्य सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. उभय देशांतील करारामुळे कृषी, सांस्कृतिक आदान-प्रदान, विज्ञान-तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्रिटिकल इंजिनिअरिंग यांसारख्या विविध क्षेत्रांत करारांवर सह्या करण्यात आल्या, त्यामुळे हा दौरा अनेक अर्थाने फलदायी आणि रचनात्मक सहकार्याचे एक नवे पर्व घेऊन आला आहे. पंतप्रधान प्लेकोविक यांनी म्हटल्याप्रमाणे भारताशी झालेल्या करारामुळे उभय देशातील व्यापार- उदीम अधिक वाढणार आहे. एक भक्कम व्यापारी भागीदार म्हणून कोरेशियाने भारताला मान्यता दिली आहे तसेच भारत हा क्रोएशियासाठी एक महत्त्वाचा आशियाई व्यापारी भागीदार म्हणून उदयास आला आहे. गेल्या वर्षी उभय राष्ट्रातील आर्थिक व व्यापारी देवाण-घेवाण २४२ दशलक्ष अमेरिकन डॉलर एवढी पोहोचली होती, तर मागील तीन महिन्यांत हा व्यापार दहा टक्क्यांनी वाढला आहे, हे सुद्धा विशेषत्वाने नमूद केले पाहिजे. उभय राष्ट्रांमधील आर्थिक संबंधांचे मूळ सांस्कृतिक मैत्रीमध्ये आहे. क्रोएशियाला भेट देणाऱ्या भारतीय पर्यटकांची संख्या सातत्याने वाढत आहे. विशेषतः मागील काही वर्षात भारतीय पर्यटक मोठ्या संख्येने क्रोएशियाकडे वळत आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या भेटीमुळे झालेल्या सकारात्मक चर्चेनुसार संबंधांची नवी क्षेत्रे उदयास आली आहेत आणि विशेषतः इन्फॉर्मेशन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी तसेच औषध, उद्योग, आयुर्वेद आणि सागरी वाहतूक तसेच अंतराळ संशोधन यासारख्या क्षेत्रांत सहकार्य मजबूत करण्यासाठी विशेष प्रयत्नांची दिशा ठरविण्यात आली आहे. पंतप्रधान मोदी यांचा पहिला दौरा असला तरी हा दौरा अनेकदृष्टीने निर्णायक व नवे वळण देणारा ठरला आहे. गागरे या महानगरीत मोदी यांचे विशेष स्वागत झाले, तसेच त्यांच्या प्रतिनिधी मंडळाने तेथील विविध स्तरातील उद्योजक, शिक्षण तज्ञ आणि वैज्ञानिक इत्यादींबरोबर चर्चाही केली. प्रातिनिधी मंडळ स्तरावरील चर्चा ही पुढील विकासाची दिशा ठरविणारी ठरली आहे. ‘‘एक्स‘‘ वर केलेल्या एका पोस्टमध्ये क्रोएशियन नेत्यांनी असे म्हटले की, आम्ही भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गागरेमध्ये उस्फूर्त स्वागत केले. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या व चौथी अर्थसत्ता असलेल्या देशाचे पंतप्रधान हे क्रोएशियाला भेट देतात, याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. भारत-क्रोएशियाचा एक महत्त्वाचा आर्थिक व व्यापारी भागीदार बनला आहे.

**भू-राजनैतिक महत्व**

भू-राजकीय दृष्टीनेसुद्धा हा दौरा अशा एका महत्त्वाच्या क्षणी होत आहे की, सबंध युरोपियन युनियनचे सर्व सदस्य देश भारताशी सहकार्य करण्यासाठी उत्सुक आहेत. त्यामुळे हा दौरा उभय देशांमध्ये अनेक क्षेत्रांत विशेषतः आर्थिक, सांस्कृतिक आणि तंत्रज्ञान विषयकक्षेत्रात एक नवा मैलाचा दगड ठरणार आहे आणि द्विपक्षीय सहकार्य मजबूत करण्यासाठी अनुरूप, अनुकूल अशी परिस्थिती उदयास येत आहे. दहशतवाद हा दोन्ही देशांमध्ये समान महत्त्वाचा मुद्दा म्हणून चर्चिला गेला. पंतप्रधान मोदी म्हणाले की, दहशतवाद हा मानवतेचा शत्रू आहे. त्यामुळे दहशतवादाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सर्व लोकशाही राष्ट्रांनी एकत्र आले पाहिजे.

**समारोप**

अशा प्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा क्रोएशिया दौरा अनेकदृष्टीने निर्णायक आणि महत्त्वपूर्ण ठरला आहे. क्रोएशियात राहणाऱ्या भारतीयांनी गायत्री मंत्राचे पठण करून मोदी यांचे स्वागत केले, तेव्हा मंत्रोच्चारामुळे एक भारलेले सांस्कृतिक वातावरण तयार झाले. शिवाय क्रोएशियाच्या पंतप्रधानांनी २०० वर्षांपूर्वी लिहिलेले संस्कृत व्याकरणाचे पुस्तक मोदी यांना भेट दिल्यामुळे भारताच्या सांस्कृतिक इतिहासात असलेली क्रोएशियाची रुची अधिक स्पष्ट होते. भविष्यकाळात भारत आणि क्रोएशिया यांच्यातील संस्कृतिक संबंध भक्कम करण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वाचा ठरला आहे. क्रोएशियातील अनेक विद्यापीठे भारतात संशोधन सहकार्य आणि तांत्रिक सहकार्यासाठी उत्सुक आहेत. नजीकच्या भविष्यकाळात दोन्ही देशांतील व्यापार दुप्पट होईल, रोजगाराची नवे क्षेत्रे उदयास येतील, आणि उभय राष्ट्रातील मैत्रीचा एक भक्कम सुवर्ण धागा अधिक प्रमाणात जोडला जाईल. मैत्रीचा हा सुवर्ण धागा जपणे, हेच भारत-क्रोएशिया संबंधांचे उज्वल भवितव्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल होय!



## जात्यावरच्या ओव्या......

---


वाटानं चाललं
भिरी भिरी वारा घेत
माझ्या बाळाच्या सारखं
वासरू हंबरत ||१४८||

अंगड टोपड
वर कुच्चीचा घोंगता
बाळाला झाली दिठं
वाडा मामाचा यंगता ||१४९||

---

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर


# अंधारापलीकडील प्रकाश हेलन केलर यांची प्रेरणादायी गाथा




ज्योतिर्मय साहित्य

दृष्टी नसणं वाईट आहेच, पण दृष्टी असूनही ध्येय नसणं अधिक वाईट आहे. हे वाक्य आहे त्या स्त्रीचं जिनं आयुष्यभर अंधारात राहतही, इतरांच्या आयुष्यात प्रकाश पेरला. तिचं नाव हेलन केलर.

तिचं जीवन म्हणजे अपार संघर्षाची गाथा आहे. जीवनात अशक्य असं काही नाही. तुमच्याकडे जर जीवन जगण्याची दुर्दम्य इच्छा असेल, काही तरी भव्य दिव्य करून दाखवण्याची जिद्द असेल, तर होय, तुम्हाला अशक्य असं काहीच नाही. हे आपल्या वागण्यातून सिद्ध करणारी महान विदुषी, वक्ता, लेखक आणि समाजसेविका हेलन केलर हिची ही अत्यंत प्रेरणादायी कहाणी तिच्या जन्मदिनानिमित्त आपल्यासमोर ठेवण्याचा हा अल्पसा प्रयत्न.




पूर्वी मी आठवी नववीला इंग्रजी शिकवत असताना, कुठल्या तरी वर्गाच्या पाठ्यपुस्तकात हा पाठ इंग्रजीत दिलेला होता. तेव्हापासून या महान विदुषीने माझ्या मनात आदराचे स्थान पटकावले होते. तिची अफाट जिद्द मला स्तिमित करून गेली होती. अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत अन आशा, किनारा तुला पामराला... या कुसुमाग्रजांच्या कोलंबसाचे गर्वगीत या कवितेतील मला आठवत होत्या.

कधी कधी मनात एक विचार येतोआपल्याला दिसतं, ऐकू येतं, बोलता येतं पण तरीही आपण आयुष्याकडे हताशपणे बघत राहतो. आणि अशा वेळी कुणीतरी समोर उभं राहतं ज्यांचं जीवन आपल्याला सांगून जातं''काहीच असणं गरजेचं नाही, फक्त इच्छा असणं पुरेसं आहे.''

असंच एक नाव म्हणजे हेलन केलर.

गंधहीन, स्वरहीन, पण जिवंत स्पंदनांनी भरलेलं आयुष्य

हेलनचा जन्म २७ जून १८८० साली अमेरिकेत झाला. लहानगी होती तेव्हा अगदी उत्साही, तरतरीत आणि चुणचुणीत दिसणारी. पण एका तापानं तिचं आयुष्य अचानक अंधारात लोटलं. कुठल्यातरी मेंदूज्वराच्या आजाराची ती शिकार झाली. आणि नंतर तिच्या भोवतालचं प्रकाशमान असलेलं जग तिच्यासाठी घनदाट अंधाराची काळोखी रात्र बनलं. तेव्हा ती फक्त १९ महिन्यांची होती. तेव्हा तिला ना दिसायचं, ना ऐकायचं, ना बोलता यायचं. घरातल्या मांजराचं गोंजारणं, आईच्या कुशीतल्या थोपटण्याचा स्पर्शहेच तिचं जग बनून गेलं.

लहानग्या हेलनच्या वागण्यात चिडचिड, अस्वस्थता दिसू लागली. आई-वडिलांना ती का रागावते, हे समजत नव्हतं. तेव्हा तिच्या आयुष्यात आली ॲनी सुलिव्हन एक तरुण, धैर्यशील शिक्षिका. त्यांनी हेलनच्या हातावर ''----'' असं लिहिलं आणि दुसऱ्या हातात पाण्याचा प्रवाह जाणवत होता. या एका क्षणात हेलनच्या डोळ्यांत (किंवा म्हणू या मनात) प्रकाश पसरला. त्या दिवसात तिनं तब्बल ३० शब्द शिकले!

(क्रमशः)



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# सख्यभक्ति


ज्योतिर्मय साहित्य

दशक चौथा
समास आठवा
नमस्कार भगवंत भक्त मंडळी.

आपण सातव्या समासात पाहिले की दास्यभक्ति मध्ये भक्त आपले सर्वस्व भगवंताला अर्पण करतो. सच्चिदानंद स्वरूपाच्या ठिकाणी मन चिकटून रहाणे यालाच अनुसंधान म्हणतात. भगवंतावाचून इतर सर्व म्हणजे उपाधि, मला कळत नाही असे वाटणे परमार्थाची पहिली पायरी होय. आणि मी आणि भगवंत वेगळे नाहीत असे वारंवार वाटणे ही शेवटची पायरी होय. मंडळी आपण तर प्रापंचिक माणसे आहोत आपले दिवसभराच्या विचार हित कर्मा नंतर जो मोकळा वेळ मिळतो तेवढा सगळा वेळ भगवंताच्या नामात घालवा.जीव व शिव एवढे एकरूप झाले पाहिजे की भगवंताचा भक्ताशी अतिपरिचय होतो. पण या ठिकाणी मात्र अवज्ञा निर्माण होण्याऐवजी. भक्त अधिक लीन, निष्काम, प्रेमळपणे वागतो.या ठिकाणी मी एक ऊदा, देते ते असे

रावणाच्या कैदेत अशोक वनात सितामाई असताना वनातील पाने, फुले,फळं झाडे दगड, धोंडें सगळेच मातेच्या प्रेमात होते. एवढे ते एकरूप झाले होते. आता आपण कलीयुगात वावरत आहोत आपल्याला पण आदर्श हवा आहे तो आदर्श कुठे मिळेल तर मी तुम्हाला निश्चितच सांगु शकते की दासबोध/संत साहित्यांत मिळेल. त्यासाठी भगवंताशी सख्य करा. ज्या दासाने भगवंताच्या मोहपाशामध्ये स्वत:ला गुंतवून घेतले आहे जन्मभर त्याचे अनुसंधान ठेवले त्याच्या सोबत जीवन वेचले त्या भगवंताचे गुण, स्वभाव व विभूति भक्तामध्ये उतरतात. भक्ताच्या प्रेमाने पवित्र केलेला आपलेपणा आणि भगवंताचा मंगलमय मित्रत्व यांचा मधुर संगम सख्यभक्ति मध्ये झालेला दिसतो. मित्रांनो सख्यभक्तित भगवंताची इच्छा तोच धर्म,तेच शास्त्र, तेच कर्तव्य, तोच व्यवहार होतो. तो भगवंताच्या अखंड सानिध्यात असल्याने जगन्मित्र होतो. षड्रिपूंच्या पासुन तो दूर असतो.

भगवंताची अनुरक्ति+ देहसुखाची विरक्ति + प्राणीमात्रां बद्दल प्रेम = सख्यभक्ति असं म्हणलं तर वावगे होणार नाही.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# देहबुद्धीचा त्याग करावा

ज्योतिर्मय साहित्य

मानाला कारण अभिमान होय. मी मोठा, असे मनाने घेतले म्हणजे मानाची गरज लागते. हा अभिमानच भगवंताच्या आणि आपल्यामध्ये आड येतो. हा अभिमान घालवायला, गुरुआज्ञेत राहणे, त्यांना शरण जाणे आणि त्यांनी सांगितलेली साधने करणे हे उपाय आहेत. पण ही साधने निरभिमानाने झाली पाहिजेत. हा अभिमान फार सूक्ष्म असतो. मी गुरुआज्ञेत राहतो, त्यांनी सांगितलेली साधने करतो, आता माझा अभिमान गेला, हे म्हणणेसुद्धा अभिमानाचेच बोलणे होय. खरे पाहता, अभिमान बाळगण्यासारखे आपल्याजवळ आहे तरी काय ? शक्ती, की पैसा, की कीर्ती ? जगात आपल्यापेक्षा कितीतरी लोक मोठे आहेत. पण मौज अशी की, भिक्षा मागणाऱ्यालासुद्धा मोठा अभिमान असतो. ''मी अमक्याच्या इथे भिक्षेला गेलो होतो, त्याने मला हट् म्हटले तेव्हापासून त्याचा उंबरठा नाही चढलो मी'' असे तो म्हणतो. तेव्हा हा अभिमान आणि अपमान ही काय चीज आहे याचा शोध आपण घ्यायला पाहिजे. याला अगदी मूळ कारण देहबुद्धी. ही देहबुद्धी नाहीशी झाली पाहिजे. एखाद्या झाडाला खत घालीत गेले तर ते मरेल कसे ? मला लोकांनी बरे म्हणावे, मान द्यावा, शिव्या दिल्या तर वाईट वाटते, हे देहबुद्धीला खत घालण्यासारखे आहे. चांगले-वाईट, मान-अपमान सर्व देवाला अर्पण करावे. वस्तुत: कर्तेपणच त्याच्याकडे सोपवावे. म्हणजे त्या कृत्याचे परिणाम मनावर होऊ देऊ नयेत. व्यवहारात थोडा अभिमान लागतोच, पण तो केवळ कारणापुरता असावा. वरिष्ठाने नोकरांशी वागताना अभिमान पाहिजे, पण तो तितक्याचपुरता; त्याचा मनावर परिणाम होऊ देऊ नये. ही देहबुद्धी, हा अभिमान, जायला सद्गुरूचे होऊन रहावे. निदान बळजबरीने तरी 'मी त्याचा आहे' असे म्हणावे. सद्गुरू तुम्हांला नकळत तुमचा अभिमान दूर करतील.

परमार्थांत संतांचेच ऐकण्यात महत्त्व आहे. तेथे आईबापांचे का ऐकू नये ? तर ज्याचे मन त्याच्या ताब्यात आहे, ज्याचे मन स्थिर झाले आहे किंवा ज्याचे मन नेहमी भगवंतापाशी आहे, अशाचेच ऐकण्यात विशेष आहे. आपल्या देहबुद्धीची तऱ्हा मोठी विलक्षण असते. सगुणोपासना आपल्या सवयीच्या आड येते म्हणून मनुष्य ती करीत नाही; फारच सोपे म्हणून तो भगवंताचे नाम घेत नाही; आणि फुकट काय जेवायला घालायचे, म्हणून तो अन्नदान करीत नाही. असा मनुष्य फुकटच जायचा ! देहबुद्धीला ताळ्यावर आणण्यासाठी संतांच्या ग्रंथांच्या वाचनाची गरज आहे. पहाट झाली की थोडा उजेड, थोडा अंधार असतो, त्याप्रमाणे सध्या आपली स्थिती आहे; देहबुद्धीच्या अंधारात भगवंताच्या स्मरणाचा किंचित् उजेड आहे. हा देहबुद्धीचा अंधकार जाऊन पूर्ण प्रकाश दिसायला, भगवंताच्या अनुसंधानासारखा दुसरा कोणता उपाय असणार ?

मीपणाची आणि अभिमानाची पूर्णाहुती देणे हाच खरा यज्ञ होय.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# संत जनाबाई यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

देह देऊनी विदेही केले
शांती देऊनी मी पण नेले

आपण सारेच देहाभिमानी आहोत आपला देह सुंदर दिसावा, तो तरुण दिसावा, तो सुदृढ दिसावा म्हणून आपण सारेच प्रयत्नशील असतो. आपल्या देहाचे इतरांनी कौतुक केले की आपण सुखावतो. मायेच्या प्रभावाने आपण या देहालाच मी म्हणून समजतो.

जेव्हा एखाद्या व्यक्तीचा अंत होतो, उदाहरणार्थ एक रामराव नावाचा व्यक्ती वारला व त्याचे प्रेत आणखी घरी पडून आहे. त्याच्या अंत्ययात्रेची तयारी चालू आहे. तेव्हा आपण ते प्रेत समक्ष असतानाही असे म्हणतो अरेरे वाईट झाले रामराव एक चांगला माणूस होता. पण ज्या देहाला आपण रामराव संबोधत होतो तो देह तर आणखी तिथेच आहे. पण त्यावेळी पुरते आपण खरे बोलत असतो. त्या देहामध्ये जो आत्मा वास करून होता त्या आत्म्याला आपण रामराव असे ओळखायला हवे असते. आपलेही असेच आहे हा देह म्हणजे मी या देहाला दिलेले नाव हे मला दिलेले आहे असे समजतो .आणि आपली मितू पणाची भावना सतत घट्ट होत जाते. मग या मी पणाला सुखावणाऱ्या गोष्टी आणि दुखावणाऱ्या गोष्टी यामुळे आपल्या मनात लोभ मोह आणि क्रोध यायला लागतो. मुळात आपला आत्मा हा स्वतंत्र आहे पण मायेच्या प्रभावाने तो ज्यावेळेस विकारांनी ग्रस्त होतो त्यावेळेस तो या देहालाच ''मी'' समजायला लागतो. आणि या देहाद्वारे घडलेली कर्मे तो मी केली आहेत असेच दृढनिश्चयाने समजू लागतो. म्हणून तो केवळ पाप पुण्याचा भागीदार होतो आणि जन्ममृत्यूच्या फेऱ्यात कायम अडकला जातो.

हे अज्ञान नष्ट करणे व विकारांचा प्रभाव संपविणे यालाच योग शास्त्र असे म्हणतात.

देहाबद्दल आसक्ती नसणे यालाच देहभावना संपुष्टात येणे किंवा विदेही होणे असे म्हणतात.

देहाबद्दलची आसक्ती नसणे याचा अर्थ हा देह नष्ट झाला तरी चालेल असे वाटणे असा सुद्धा नाही. कारण आत्महत्या करणारे लोक हा देह नष्ट व्हावा म्हणून प्रयत्न करतात तसा प्रयत्न करणारे सुद्धा विदेही झाले, असे म्हणणे सर्वथैव चूक आहे. देहाबद्दल आसक्ती नको आणि त्याचा तिरस्कारही नको. तर देह आपणास भगवंताने का दिला आहे त्या कारणाकरता तो वापरणे हे काम संत महात्मे करतात. भगवंतांनी आपल्याला हा नरदेह केवळ साधना करण्यासाठीच दिला आहे. मायेच्या पसाऱ्यातून आपणास मुक्त होता यावे ,आपले संचित कर्म नष्ट करता यावे म्हणून जी प्रखर साधना करावयाची असते ती या नरदेहा व्यतिरिक्त अन्य कुठलेही योनीतून करता येत नाही. केवळ मनुष्य देह या साधनेसाठी उपयुक्त आहे. संत महात्मे या देहाविषयी ममत्वही बाळगत नाहीत व त्या स पीडाही देत नाहीत. तर साधनेसाठी हा देह टिकावा आणि उपयोगात यावा म्हणून त्याचे पालन पोषण करण्याइतपत या देहाची ते काळजी घेतात. यालाच देहाची उदासीनता म्हणतात.

उत् आणि असीन अशी उदासीनतेची फोड आहे.उत् म्हणजे वर आणि असीन म्हणजेच स्थिर होणे म्हणजे हा देह म्हणजे मी हे तादात्म सुटणे हे महत्त्वाचे आहे.

श्रुतीचे असे एक वचन आहे की एवमेव एशा संप्रसाद (जीव) समुत्थाय (उठणे) परमजोती तस्यात शरीरात समुत्थाय स्वेन रुपेन अधिपत्यते

देह म्हणजे मी यातून वर उठलेला देह भाव हा ब्रम्हरूप होतो. तो परमज्योती रूप होण्यासाठी जीवाला देहाच्या तादात्म्यातून बाहेर यावेच लागते. यालाच देहाची उदासीनता किंवा विदेही होणे असे म्हणतात.

(क्रमशः)



## ॥ निरूपण ॥

ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं माये विश्वस्य पालिके।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं माये सन्तापनाशिनि ।। १२ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. जगदंबे, माये, विश्वपालिके, तुला नमस्कार असो. जगदंबिके, माये, संतापाचा नाश करणारे, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं मातापुरनिवासिनि।**
**नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं श्रीरेणुके नमो नमः ।। १३ ।।**

माहूर क्षेत्री निवास करणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. हे रेणुके तुला वारंवार नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं मतिरूपाय ते नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं शक्तिरूपाय ते नमः।। १४ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझ्या बुद्धीरूपाला नमस्कार असो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझ्या शक्तीरूपाला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं स्थितिरूपाय ते नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं गतिरूपाय ते नमः।। १५ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझ्या स्थितीरूपाला नमस्कार असो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझ्या गतीरूपाला नमस्कार असो.



## आरोग्य संजीवनी

# यूरिक ॲसिड म्हणजे काय?

ज्योतिर्मय साहित्य

यूरिक ॲसिड वाढण्याची समस्या वेगाने वाढत आहे. वय वाढत असताना शरीरात ''गाऊट'' (आर्थरायटिस) होण्याची शक्यता जास्त असते. चुकीच्या जीवनशैलीमुळे, अयोग्य आहारामुळे आणि दिवसाच्या दिनचर्येत झालेल्या बदलांमुळे शरीरात यूरिक ॲसिड तयार होण्याची प्रक्रिया वाढते.

भोजनाच्या पचन प्रक्रियेदरम्यान प्रथिनांपासून अमिनो ॲसिडआणि प्युरिन यांपासून यूरिक ॲसिड तयार होते. हे ॲसिड रक्तामध्ये असंतुलन निर्माण करते, ज्यामुळे सांध्यांमध्ये (जोडांमध्ये) क्रिस्टल तयार होऊन वेदना होतात.

यूरिक ॲसिडची लक्षणे

१. सांधे आणि पायांमध्ये वेदना.

२. पाय, टाच आणि सांध्यांमध्ये सूज येणे.

३. एका जागी बराच वेळ बसल्यावर पायांमध्ये त्रास होणे.

४. हाताच्या बोटांमध्ये आणि सांध्यांमध्ये चुभण किंवा जळजळ होणे.

५. रक्तातील साखरेची पातळी वाढणे.

जर अशी लक्षणे जाणवली, तर लवकरात लवकर यूरिक ॲसिडची तपासणी करून घ्या.

यूरिक ॲसिड कमी करण्यासाठी उपाय

१. आहारामध्ये हाय फायबरयुक्त पदार्थ: पालक, ब्रोकली, ओट्स, दलिया, आणि इसबगोल यांचा समावेश करा.

२. आवळा आणि अलोवेरा रस: सकाळ-संध्याकाळ जेवणाआधी १० मिनिटे प्या.

३. टोमॅटो आणि द्राक्षांचा रस: नियमित सेवन केल्यास यूरिक ॲसिड कमी होण्यास मदत होते.

४. अलसीचे बीज: प्रत्येक जेवणानंतर १ चमचा चावून खा.

५. जैतून तेलाचा वापर: स्वयंपाकासाठी तेल म्हणून वापरल्याने फायदा होतो.

६. अखरोट खाणे: जेवणाआधी अखरोट खाल्ल्यास पचन सुधारते आणि यूरिक ॲसिडची निर्मिती कमी होते.

७. विटामिन युक्त पदार्थ: लिंबू, संत्री, आणि इतर सायट्रस फळे खा.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

यूरिक ॲसिड वाढल्यावर टाळावयाच्या गोष्टी

१. मांसाहार: मासे, मटण, आणि अंडी पूर्णपणे बंद करा.

२. बेकरी पदार्थ: पेस्ट्री, केक, बिस्किटे टाळा.

३. जंक फूड: पिझ्झा, बर्गर, आणि तळलेले पदार्थ खाणे बंद करा.

४. तिखट, मसालेदार आणि साखरयुक्त पदार्थ: या गोष्टी पचनाला हानी पोहोचवतात.

५. शराब आणि बीयर: या गोष्टींमुळे यूरिक ॲसिड अधिक वाढते.

यूरिक ॲसिड नियंत्रित ठेवण्यासाठी जीवनशैलीतील बदल

१. रोज ४५-४५ मिनिटे वेगाने चालण्याची सवय लावा.

२. योगा आणि व्यायाम नियमित करा.


३. दररोज ४-५ लिटर पाणी प्या.

४. घरातील ताजा आणि संतुलित आहार घ्या.

नियमित तपासणी आणि उपचार करा

जर यूरिक ॲसिड वाढल्याची लक्षणे दिसली, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या. योग्य आहार आणि दिनचर्या यामुळे समस्या नियंत्रणात राहते.

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

दशरथाचे मित्र अश्वपती (कैकयीचे वडील) होते.एकदा दशरथ त्यांचेकडे गेले असताना अश्वपतीने दशरथाची व्यवस्था पाहण्याची जवाबदारी त्याची मुलगी कैकयीहीस दिली.ती तरूण व खुप सुंदर होती. तिने दशरथाची उत्तम सेवा केली. आधीच्या दोन पत्नींना तोवर अपत्य झाले नव्हते. आता तिसरे लग्न करावे काय? हा विचार दशरथाचे मनात चालू होता.त्यांनी अश्वमेधजवळ कैकयीचा हात मागितला त्यावेळी त्याने दशरथा कडून हिचा मुलगा राजा होईल असे वचण घेतले होते.तोवर आधी एकही मुलगा नसल्याने हे अडचणीचे ठरणार नव्हते, त्यामुळे दशरथाने तसे वचन दिले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

एकदा सिता रामास विचारते, तुम्हाला काय जास्त आवडते ? राम म्हणाले, मला माझा प्राण प्रिय आहे.त्यापेक्षा काय प्रीय आहे ? माझ्या प्राणा पेक्षा मला तू आवडतेस सीते.सिता पुन्हा म्हणाली माझ्या पेक्षा काय जास्त आवडते? तर राम म्हणाले तुझ्या पेक्षा मला लक्ष्मण आवडतो. त्याच्या साठी एकवेळ मी तुला सोडेन.सिता विचारते लक्ष्मणा पेक्षा अधिक काय आवडते?लक्ष्मण पेक्षा मला माझे वचन पाळायला आवडेल. दशरथाने अशवपतीस एकांतात ते वचन दिले होते.ते कैकयीस सुद्धा माहीत नव्हते त्याला तिची भीती नव्हतीच ,भीती अश्व पतीची होती. भरताला दशरथाने अश्व पतीकडे पाठविले भरत तिथे असल्याने अश्व पती अयोध्ये पासून ,मनाने दूर राहील व दुसरे भरताचे रामावर आत्यंतिक प्रेम होते ते त्या आजोबा जवळ रामाचे गुणगान करील या मुळे विरोध तो करणार नाही.

(क्रमशः)

# फुलमाला....





तेरडा फुल...

भाद्रपद महिन्यात याचा बहर,
विविध रंगात तेरडा फुलतो.
गौरी, गणेशाच्या चरणी वाहता,
जणू याचा लाल रंग खुलतो.

हळू हळू फिकट होत जाते,
हे फुल दिसत नाही मग रंगीत.
म्हणुन तेरड्याचा रंग तीन दिवस,
ही म्हण झाली असेल प्रचलीत.

सौ. माधुरी म.इनामदार, मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

## भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी रवींद्रनाथ

जपानमध्ये तीन महिने त्यांचे वास्तव्य होते तेथील त्यांच्या वास्तव्यात जपान मधील ग्रामीण भागातील लोकजीवन त्यांनी जवळून पाहिले. जपानमधील निसर्गसौंदर्य त्यांना खूप आवडले. जपान म्हणजे पर्वतांच्या रांगा, झुळझुळणारे झरे, विस्तीर्ण किनाऱ्यावर आदळणाऱ्या समुद्राच्या लाटा आणि संरक्षण करण्यासाठी उभा ठाकलेला आणि बर्फाची टोपी परिधान केलेला फुजियामा पर्वत ! त्यांना असे आढळले की जपानी लोकांजवळ मोठ्या प्रमाणावर सौंदर्यदृष्टी आहे आणि तेथील अगदी गरीबातील गरीब माणूस ज्याला दोन वेळेचे पुरेसे अन्न सुद्धा मिळत नाही असा माणूस सुद्धा एका पेनीची फुले विकत घेतो. त्याच्या दृष्टीची आणि सौंदर्याची भूक त्याच्या पोटाच्या भुकेपेक्षा काकणभर देखील कमी नाही. जपानमध्ये अनेक ठिकाणी सादर करण्यात आलेले नृत्य पाहून रवींद्रनाथ भारावून गेले. त्यांच्या नृत्यात त्यांना विनय आढळला. कारण ते ( जपानी लोक ) फक्त सौंदर्यदृष्टीने त्याकडे बघत होते.

रवींद्रनाथ त्यांच्या नृत्याबद्दल बोलताना म्हणतात,‘‘ एक दिवस मी जपानी नृत्याचा कार्यक्रम पाहायला गेलो, तेव्हा मला असं दिसलं की हे नृत्य म्हणजे अंगप्रत्यंगाच्या हालचालीचे संगीत आहे. आपल्या देशातील वीणेवर छेडल्या जाणाऱ्या संगीताशी याची तुलना होऊ शकते. दोन भागात हे सादर करीत असतानाही मध्ये थांबत नाही. वेगवेगळ्या टप्प्यात अंतर भासत नाही. अगर दोन भाग सांधत असताना जाणवत देखील नाही. पूर्ण अंग चढत जाणाऱ्या वेलीसारखं उंचावतं आणि जणू सौंदर्य फुलांची उधळण करतं. जपानी नृत्य हे शुद्ध नृत्य आहे. या नृत्याच्या पोशाखात थोडेही अंग उघडे पडण्यास वाव नाही. इतर देशातील नृत्यात अंगप्रत्यंगाच्या हालचाली बरोबर कामुक हावभावांचे देखील मिश्रण असते. ह्या नृत्यात मात्र अशा भावना सुचित सुद्धा होत नाहीत.‘‘

त्यानंतर मेजर पाँड यांच्या आमंत्रणावरून ते अमेरिकेला गेले. तेथे अनेक ठिकाणी त्यांची व्याख्याने झाली. तिथे त्यांच्या शांतीनिकेतनच्या शाळेविषयी ते बोलले. ‘‘सृष्टीद्वारे मानव स्वतःचे क्षितिज उंचावू शकतो आणि पुनर्जन्म घेऊ शकतो ‘‘ ही कल्पना त्यांनी तिथे मांडली. तेथील त्यांची व्याख्याने पर्सनॅलिटी या पुस्तकात संकलित करून प्रसिद्ध करण्यात आली. त्यांनी हे पुस्तक आपले त्यावेळचे जवळचे मित्र सी एफ अँड्रयुज यांना अर्पण केले.

त्यांच्या इंग्लंड आणि अमेरिकेच्या केलेल्या पुढील दौऱ्यात मात्र त्यांचे व्हावे तसे स्वागत झाले नाही. त्याचे एक कारण म्हणजे इंग्रजांनी जालियनवाला बाग येथे केलेल्या निष्पाप लोकांच्या हत्याकांडाच्या निषेधार्थ रवींद्रनाथांनी आपली सर ही पदवी परत केली होती. ब्रिटिश लोक साधारणपणे स्वभावाने अतिथ्यशील असतात. परंतु जिथे त्यांच्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेशी विपरीत असलेली कोणतीही गोष्ट घडते, तेव्हा मात्र ते तितक्याच अलिप्ततेच्या भावनेने वागतात हा अनुभव त्यांना इंग्लंडमध्ये आला. त्यांच्या या प्रवासादरम्यान इंग्लंड आणि अमेरिकेत झालेली औद्योगिक क्रांती त्यांनी पाहिली. प्रचंड यंत्रे आणि त्यातून मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या वस्तूंनी मानवी जीवनावर आक्रमण केले आहे हे त्यांच्या लक्षात आले. काही गोष्टींची माणसाला गरज नसतानाही केवळ मुबलक निर्माण होणाऱ्या वस्तूंच्या उपभोगासाठी कृत्रिम गरजा निर्माण केल्या जात आहेत असे त्यांना जाणवले. अतिरिक्त तांत्रिक आणि यांत्रिक विकासामुळे मानवाभोवती एक कवच निर्माण होऊन तो नैसर्गिक गोष्टींपासून दूर जाईल अशी भीती त्यांना वाटू लागली. मानव यंत्राद्वारे संपत्ती निर्माण करतो आहे पण आध्यात्मिक मूल्यांचा त्याग करून त्यासाठी मोठी किंमत तो मोजतो आहे. मानवाने स्वतःभोवती निर्माण केलेला पिंजरा जरी सुवर्णाचा असला तरी तो बाहेरच्या जगाचा संबंध तोडून टाकतो.

आपले हे विचार स्पष्ट करण्यासाठी त्यांनी घरटे आणि पिंजरा यांचे रूपक वापरतात. ते म्हणतात, ‘‘ पाखराला घरट्याची गरज असते ती निवाऱ्याचे स्थान म्हणून. त्यामुळे त्याला भराऱ्या मारण्यासाठी अटकाव होत नाही. परंतु जेव्हा तो पिंजऱ्यात असतो तेव्हा त्याला राहण्यासाठी उत्तम निवारा मिळतो. पण तो आकाशात भरारी मारण्याचे त्याचे स्वातंत्र्य गमावून बसतो. तांत्रिक ज्ञान हे काही मर्यादिपर्यंतच आर्थिक सुरक्षितता आणि आराम देऊ शकते. परंतु दुसऱ्या बाजूने जर तंत्रज्ञानाचा विकास असाच अनंत काळापर्यंत सुरू राहिला तर वस्तुस्थिती अशी होते की मानव स्वतःच्या गरजा गुणकाने वाढवून घेऊन स्वतःलाच त्या पिंजऱ्यात बंद करून घेतो. रवींद्रनाथांचे हे विचार आजही कालवाह्य झालेले नाहीत किंबहुना आज त्यावर विचार करण्याची अधिक आवश्यकता आहे. **(क्रमशः)**

# भटकंती


ज्योतिर्मय साहित्य

शाळेचा पहिला दिवस होता. मुलं शाळेत आली होती.बरीचशी मुलं मात्र शाळेत नव्हती. काही शाळेत मुलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. काही मात्र सुट्टी नंतर शाळेत आल्याने निराश वाटत होते. काही लोकं नाव टाकायला येत होते. तर काही मंडळी आपल्या मुलाचे नाव शाळेतून काढायला येत होते. मंगलाही शाळेत आपल्या मुलाचे नाव टाकायला आली होती. मंगला पाड्यावर राहणारी एक अशिक्षीत महिला. तिच्याही मनात शिक्षणाची ज्योत पेटली होती. भावेशला शिकवावे आफीसर करावे असे तिलाही वाटत होते. त्यामुळे की काय तिने बाळाला शाळेत आणले होते.

भावेशच्या आईनेही आपल्या बाळाला शाळेत आणले होते. घरी विश्वकोटीचं दारिद्र्य असल्यानं त्याचे मायबाप काही शिकले नव्हते. तसेच मुलांचे शाळेत नाव टाकण्यासाठी शाळेत दाखले हवे असतात.तेही त्यांना माहीत नव्हते.पाड्यावर राहणारी त्याची आई.... कसेतरी किड्यामुंग्यासह जगण्यात त्यांचा अख्खा दिवस जात होता. त्यातच शिक्षणाचं महत्व लक्षात आल्यावर ती आपल्या मुलाचे नाव शाळेत टाकायला आली होती.

शाळेत शिक्षकांनं सांगीतलं की आम्हाला या मुलााचा जन्माचा दाखला हवा आहे. त्या प्रश्नावर भावेशची आई चिंतेत पडली. एरवी दाखला कोठे मिळतो. हेही तिला माहीत नव्हते. गरोदरपणात बाळंतपण तिचं पाड्यावरच झालं होतं. त्यामुळे जन्माचीही नोंद करावी लागते याची कल्पना तिला नव्हती.त्यातच पोटासाठी भटकंती करीत करीत भावेळच्या आईने कितीतरी गावं बदलवली होती. त्यातच आता सात वर्ष निघून गेले होते.

शिक्षणाचा गंध नसल्यानं कोणीही पाड्यावरचा माणूस आपल्या पोरांना शिकवीत नव्हता. त्यांना शिक्षणाचं महत्व माहीत नव्हतं. तसं गुरुजींनी म्हटलेला दाखला मात्र भावेशच्या आईसाठी नवीन होता. शिवाय भावेशचा जन्म




कोणत्या गावी झालाय हेही तिला नक्की आठवत नव्हतं. तसेच जन्म केव्हा झालाय हेही तिला आठवत नव्हतं. कारण असे कितीतरी पाडे तिनं बदलले होते. तशी ती गुरुजींना म्हणाली,

‘‘सायेब, दाखला म्हंजे काय जी. कोटं भेटते?‘‘

‘‘जिल्ह्यात.‘‘ शिक्षकानं उत्तर दिलं.

शिक्षकांच्या म्हटल्यानुसार ती जिल्ह्यात चकरा मारु लागली. पण तिला शेवटपर्यंत चकराच माराव्या लागल्या. घरी पोटाची भटकंती करीत असतांना आता शिक्षणातही भटकंती! तिला पोटाची भटकंती पटत होती. पण शिक्षणातील भटकंती काही पटत नव्हती. त्यातच तिनं निर्णय घेतला की दाखला मिळत नसेल तर आपण पोराला शिकवायचंच नाही. आपलं जीवन मुळात भटकत असलेलं. त्यातच मुलाला शिकवणे जमतच नाही.असे असतांना आपण आपल्या पोराला शिकवायला लागलो. पण हे दाखले आपण कसे काढावे कोठून काढावे. वेगवेगळे प्रश्न आपल्या समोर आ वासून उभे आहेत.

समाजातील काही लोकांची परीस्थिती अशीच आहे. शिक्षणाचा गंध नसल्यानं काही मंडळींना शिक्षणाचं आजही महत्व वाटत नाही. दाखल्यासाठी वणवण भटकणे त्यांना परवडत नाही. पोटाचाच प्रश्न जिथे सुटत नाही. तिथे दाखल्याचं काय?आजही हे दाखले मिळत नसल्यानं पाडेवाल्यांच्या घरची मंडळी अशिक्षीत असतात. निव्वळ पाडेवाल्यांचीच नाही तर आजही बऱ्याचशा मुलांची परीस्थिती तीच आहे.

महत्वाचं म्हणजे शिक्षणासाठी दाखला अनिवार्य असावा काय ? शिक्षणाने दाखले मागावे काय? पहिल्या वर्गात प्रवेश घेतांनाही. ज्याचेजवळ असे दाखले नसतील त्यांनी काय करावे?शिकण्याची इच्छा असतांना जर असे दाखले नसतील तर... निदान या गोष्टीचा तरी शासनाने विचार करण्याची गरज आहे. मंगलाला दाखला न मिळाल्यानं मंगलानं आपल्या मुलाला शिकवलं नाही. केवळ तिनं स्वतःही भटकंती केली. मुलालाही करायला लावली. ज्या वयात मुलांना शिक्षण हवं होतं, त्या वयात भावेश आपल्या वडीलामागे पोटासाठी भटकत होता. या गावावरुन त्या गावाकडे. शिकण्याची इच्छा असूनही केवळ शासनाच्या शिक्षणासाठी दाखले हवे या धोरणामुळे. निदान दोष कोणाला द्यायचा हेही त्याला समजत नव्हते.

****

# जंगल-जीवनाचे काव्यमय दर्शन

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार वाचक मित्र हो-

अनेक वर्षांपासून साहित्य क्षेत्रात लेखन सक्रिय असलेल्या साहित्यिका ज्योती देशपांडे -उटगीकर यांनी मोठ्यासांठी, तसेच बालमित्रांसाठी कथा, बालकथा, कविता, भाषाविषयक कोडी व इतर माहितीपर लेखन सातत्याने केले आहे.

अशा या लेखिकेच्या अनेक वर्षांच्या वैविध्यपूर्ण लेखन-प्रवासात त्यांच्या बालकवितांचा संग्रह प्रकाशित झालाय, ही आनंदाची गोष्ट आहे.

आधुनिक जंगल बुक ‘‘हा त्यांचा पहिला बालकविता संग्रह उत्कर्ष प्रकाशन, पुणे यांनी २६ जानेवारी २०२५ ला प्रकाशित केला आहे.

५९ पृष्ठांच्या या संग्रहात एकूण २७ कविता आहेत, या सर्व कवितेतून वाचकांना आवडेल अशी जंगल-सफर ‘‘ कवयित्री ज्योती देशपांडे यांनी घडवून आणताना, जंगल-गाईडची भूमिकाही चोखपणे बजावली आहे. छान छान गोष्टीच त्यांनी कवितेतून मनोरंजक शैलीत सांगितल्या आहेत. या डबल-रोलबद्दल त्यांचे अभिनंदन करायला हवे आहे.


मित्र हो-

‘‘जंगल बुक ‘‘ हे जगभरातील लहान-थोर वाचकांची प्रिय अशी साहित्यकृती आहे. जंगल आणि वन्य-प्राण्यांची ओळखच जणू जंगल बुक मुळे झाली. याची काव्यरुप आठवण व्हावी असा हा आधुनिक जंगल बुक‘‘ नावाचा बालकविता संग्रह आहे.

बालकविता संग्रह म्हटले ती कमी कडव्यांची, कमी ओळींची कविता ‘‘ हे आपल्या परिचयाचे आहे. प्रस्तुत आधुनिक जंगल बुक ‘‘मधील कविता मात्र दोन - दोन पानांच्या मोठ्या कविता आहेत.

एकूण सत्तावीस कवितांपैकी सोळा ( १६) कवितांच्या शीर्षकाचा आरंभ‘‘ जंगलातील ‘‘ या शब्दाने झालेला आहे.

उदा: जंगलातील शाळा (पृ.७), जंगलातील सर्कस (पृ.९), जंगलातील दिवाळी (पृ.१३), जंगलातील सारेगम पृ.२२), जंगलातील नाटक (पृ.२६), जंगलातही आले इंटरनेट (पृ.२८), विचित्र जंगल ( पृ.३२), जंगलाचा राजा (पृ.४१),







या सर्व कवितेतून प्राणी मानवास संदेश देत आहेत.

हे सर्व संदेश ‘‘प्राणिमात्रांच्या जीवनावर माणसाने केलेल्या आक्रमणबद्दल आहेत.‘‘

उदा: जंगलातील दूरदर्शन (पृ.११) या कवितेतली ही ओळ:

‘‘जंगलाच्या टी व्हीवर संदेश देतो वाघ

‘‘माणसा माणसा जरा नीट वाग ..

२. जंगलातील प्राण्यांचे हॉटेल (पृ..१६)..

यात जंगलाचा राजा सिंह ‘‘ म्हणतो :

‘‘आजपासून माझा एक विचार
जगा आणि जगू द्या हाच आचार
...

३. जंगलातील निवडणूक ..(पृ.२०)
:

जंगलाचा राजा सिंह देखील निवडणूक आहे‘‘ याचा विचार करून आश्वासन देतो आहे :

‘‘करणार नाही मी उगाच शिकार

‘‘कारणाशिवाय ना मारणार कुणाला ठार

‘‘सारे मिळून आपण सुखाने राहू

‘‘ तुम्ही अन मी आहोत भाऊ भाऊ ..

४. जंगलातही आले इंटरनेट (पृ.२८):

आधुनिक तंत्रज्ञान किती आवश्यक आणि उपयोगाचे आहे हे या कवितेतून छान सांगितले आहे.. जंगलाचा राजा सिंह म्हणतो की आपणही इंटरनेटवर मेसेज देत जाऊ या :

‘‘द्यावा त्या सगळ्यांना जंगल संरक्षणाचा संदेश

‘‘ना केवळ आमचा, पण निसर्गाचाही हाच संदेश..

सत्तावीस कवितांपैकी अकरा कविता या परिचित गोष्टींवर आधारित काव्य-गोष्टी आहेत असे म्हणावेसे वाटते..

या कविता वाचतांना वाचकांना त्या त्या गोष्टी आठवतील, कवितांच्या सोबत असलेल्या चित्रांची यासाठी मोठी मदत होते.

या कवितांची शीर्षके :

कोल्हा आणि कावळा (पृ.३८), ससा आणि कासव (पृ.४६), कोल्हा आणि करकोचा (पृ.५२),

दोघांचे भांडण (पृ.५७) आणि शेवटची कविता

‘‘ आंबट द्राक्षे (पृ.५९).

आधुनिक जंगल बुक ‘‘ मधील ‘‘ सुरेख, बोधप्रद काव्य-गोष्टी ‘‘ लहान-थोर सर्वांनाच आवडतील अशा आहेत.

श्री.अशोक बोकील यांनी केलेल्या मुखपृष्ठावर आवडणाऱ्या प्राणी-मित्रांना पाहून वाचकमित्र खुश होतील.

साहित्यिका ज्योती देशपांडे(उटगीकर) यांच्या लेखन-प्रवासास शुभेच्छा.

आधुनिक जंगल बुक (बालकविता संग्रह)

पृ.५९, मूल्य-१००/-

कवयित्री- ज्योती देशपांडे

उत्कर्ष प्रकाशन- पुणे. मो.- ९८२२४१००३७



# इंदापुरी निखारे

## चांदोबा चांदोबा लपलास का?



ज्योतिर्मय साहित्य

एक कथा वाचता वाचता... कथेतील घटनाक्रमात रमून गेला... त्याचा त्याला २५/३० वर्षांपूर्वीचा काळ आठवत गेला... झालेले प्रचंड बदल... लहानपणी कॅलक्यूलेटर पण... चोरून वापरावा लागण्याचे दिवस... आता लहानपणापासून मोबाईल, लॅपटॉप... मुलामुलींच्या हातात... पण त्याही परिस्थितीत... आयआयटी इंजिनियर झाला... आणि ते अमेरिकेतील धावपळीचे जीवन सोडून... पुन्हा भारतात... त्याची बायको, मुले मात्र नाही आली... म्हणाली भेटत जाऊ अधूनमधून... जमले तर... त्या प्रेमाच्या ओलाव्यामुळे... त्याला त्याचा निर्णय पक्का करता आला... त्याच्या बंगल्याच्या बाजूला... म्हणजे तो अमेरिकेत गेला... तेव्हा मोठी सोसायटी झाली होती... तेव्हा बाहेर अंगणात बसत असे... त्या सोसायटीच्या वॉचमनची... छोटी मुलगी खेळताना दिसत असे... तो वॉचमन त्याच्याच वयाचा... अधूनमधून बोलत असे... केव्हातरी वर्षातून... आणि आईवडील गेल्यावर...

दोनचार वर्षांनी कधीतरी येत असे... तेव्हाही काहीतरी बोलत असे... त्याच्या बरोबर गावरान भाषा बोलण्याचा आनंद वेगळाच... आज त्याचे खास मित्र येणार होते...मस्त बाहेर अंगणात तयारी केली होती...

तेव्हा कॉलेज मध्ये शिकताना... चोरून पार्टी म्हणून... त्या अंगणात बसून दारू, बियर वगैरे...

पण आता राजरोसपणे...

अंगणात पार्टी... २५/३० वर्षात झालेला बदल...

काही मित्र आले... अघळपघळ गप्पा रंगल्या...

बियरच्या बाटल्या ओपन करतांना येणारा आवाज मस्त रंगत आणत होता... बरेच जणं बाहेर देशातील नोकरी सोडून... आता मस्त एंजॉय... हाच एकमेव उद्देश... रात्री पार्टी संपत असताना तो वॉचमन एका लहान मुलीला झोपवत होता...तो बघ... आता चांदोबा मामा आला ना... आता झोपायची वेळ झाली...तो रोज येऊन सांगतो ना... मी आलो की तुम्ही झोपायचे...

मनात विचार आला... बहुतेक याची मुलगी आली असणार... आणि नातीला झोपवत असणार...

ती वाक्ये तो कित्येक वर्षांनी ऐकत होता...

चांदोबा चांदोबा लपलास का?

वॉचमन त्याच्या मुलीला पण अगदी असेच झोपवत असे... अगदी एखादं साधं वाक्य पण...

किती रम्य आठवणी करून देतं असते...

सकाळी रेंज प्रॉब्लेम मुळे... मोबाईलवर बाहेर येऊन बोलत होता... तो नातीला घेऊन...

काऊदादा,चिऊताई दाखवत होता...

मोबाईल वरील बोलणे संपले... आणि तो समोरच असल्याने विचारले... काय? नात ना...

मुलगी आली वाटतं...

जावई बापू पण आले आहेत का?

नात आहे... पण मुलगी जावई नाही...

त्यांना जाळून मारून टाकले...

आमच्यात तशी परंपरा आहे सर...

पहिली मुलगी झाली तर मारून टाकायचे...

आम्हाला मुलगी झाली तेव्हा... आम्ही पळून आलो शहरात... नाहीतर...

अरेरे, पण मग पोलीस स्टेशन... मधेच थांबावत म्हणाला... तो खर्च कुठे परवडतो...

नातीला एका नातेवाईकाने आणून सोडले...

माझे नाव नका सांगू म्हणाला...

२५/३० वर्ष झाल्यानंतर... तो वॉचमन पुन्हा...

कोणतीही उमेद नसताना... जगण्यासाठी... आनंदाने मरण्यासाठी... मृत्यू... तो विचार पण नाही... त्याच्या मनात...

जीवन आनंदाने जगण्यासाठी...


दुसऱ्या साठी जगणं आनंददायी... त्याला आपले कुटुंब आठवले... तुम्ही जा परत... आम्हाला नाही जमणार... घरात आला... लॅपटॉप उघडला... बायकोला, मुलांना इमेल केला... मी येथे एका लहान मुलीला दत्तक घेत आहे... एक नवी सुरुवात... जीवन जगण्यासाठी... स्वतःसाठी नाही तर दुसऱ्यांसाठी... तुम्ही जगायचे कसे हे निश्चित ठरवू शकता... आणि मरणाची वाट पहात जगण्यापेक्षा... त्या मृत्यूला बिनधास्त सांगता येते... येरे केव्हाही... निदान एव्हढे तरी बिनधास्त बोलता येण्याचे भाग्य आहे आपल्याला...




# क्रांतीकारकांत श्रेष्ठ योग्यतेचे संघटक - राजेंद्रनाथ लाहिरी

ज्योतिर्मय साहित्य

भारतीय क्रांतिकारकांचे प्रतिभासंपन्न अग्रणी स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपल्या ५७ चे स्वातंत्र्यसमर या विख्यात ग्रंथात म्हंटले आहे.... ''ठराविक नियमांनी आजपर्यंत कोणत्याही क्रांतीचे कधीच नियमन झालेले नाही. क्रांती म्हणजे घड्याळ्याप्रमाणे चालणारे बिनचूक यंत्र थोडेच आहे! क्रांतीच्या खुणेचा असा शब्द एकच असतो, नि तो म्हणजे थांबू नका! किंवा सारखें पुढे रेटा! केंव्हा केंव्हा अगदी नवीन नि अनपेक्षीत अशा गोष्टी भर क्रांतीमध्ये उद्भूत होतात; तरीही कोणीही थांबता कामा नये. त्या अनपेक्षित परिस्थतीवर स्वार होऊन सारखे पुढे दौडत राहिले पाहिजे. ज्याला या क्रांतिपक्षाच्या पाठीवर आरूढ होऊन आपले ध्येय गाठावयाचे असेल त्यानें आपले आसन त्या पक्षाच्या पाठीवर बळकट टिकविण्याची दक्षता घेतली पाहिजे. प्रथम महायुद्धातील गदर च्या विफलतेवर व असहयोगाच्या गुंगीवर स्वार होऊन भारतीय क्रांतीकारकांनी १९२३ मध्ये शचींद्रनाथ संन्याल व योगेशचंद्र चटर्जी यांच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशन म्हणजेच भारतीय प्रजातंत्र' या नांवाने क्रांतीचे अग्निकुंड पुन्हा नव्या जोमानें चेतविण्यास प्रारंभ केला. शचींद्रनाथ संन्यालांनी योगेशचंद्र चटर्जी यांच्याद्वारे अनुशीलन समिती व आपला पक्ष यांच्यात पूर्ण एकात्मता प्रस्थापित करून हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशन या संस्थेची नवी घटना तयार केली. कामकरी व शेतकऱ्यांना अधिकार देऊन शोषणहीन राज्यपद्धतीचा या घटनेत पुरस्कार करण्यात आला होता. या असोसिएशनच्या शाखा उत्तर भारतातील प्रत्येक प्रांतातून काढण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला होता. संयुक्त प्रांताच्या शाखेचे पं. रामप्रसाद बिस्मिल, सुरेशचंद्र भट्टाचार्य, विष्णू शराबा दुबलिस आणि राजेंद्र लाहिरी प्रमुख होते. राजेंद्र लाहिरी हे संयुक्त प्रांतातील क्रांतीकारकांत श्रेष्ठ योग्यतेचे संघटक म्हणून प्रसिद्ध होते. काकोरी कटाच्या प्रकरणात त्यांना १७ डिसेंबर १९२७ रोजी गोंडा येथील कारागृहात फाशी देण्यात आले. वास्तविक काकोरी कट प्रकरणात पं. रामप्रसाद बिस्मिल, ठाकूर रोशनसिंह, अशफाक उल्ला खान यांच्याबरोबरच १९ डिसेंबर १९२७ रोजी राजेंद्र लाहिरी यांना फाशी देण्यात येणार होते. काकोरी कट प्रकरणात फाशीची शिक्षा ७ एप्रिल १९२७ रोजी ठोठावण्यात आली होती. ठरलेल्या १९ डिसेंबर १९२७ रोजी राजेंद्र लाहिरी यांना फाशी देण्याऐवजी २ दिवस आधी म्हणजे १७ डिसेंबर १९२७ रोजी गोंडा जेल मध्ये त्यांना फाशी देण्यात आली. इंग्रज शासनास अशी भीती होती कि, राजेंद्रनाथ लाहिरी यांचे साथीदार जेल फोडून त्यांना सोडवतील यासाठी हा निर्णय घेण्यात आला. राजेंद्रनाथ लाहिरी यांनी देशासाठी हसत हसत फाशी स्विकारली. फाशीच्या वेळी जेलरला ते म्हणाले... जेलरसाहब, मैं मर नही रहा. एक स्वाधीन भारत में दोबारा जन्म लूंगा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील महत्वाचे योगदान म्हणून स्वातंत्र्यसेनानी राजेंद्र लाहिरी यांची ऐतिहासिक नोंद आहे.



बंगालमध्ये (आजचा बांगलादेश) पबना जिल्ह्यातील मोहनपुर गावामध्ये २९ जून १९०१ रोजी राजेंद्र लाहिरी यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नांव क्षिति मोहन लाहिरी तर आईचे नांव बसंतकुमारी. या बंगाली कुटुंबाची मोठी मालमत्ता होती. त्यांच्या जन्माच्या वेळी वडील क्रांतीकारी क्षिति मोहन लाहिरी आणि मोठे भाऊ बंगालमधील अनुशासन समितीमध्ये कार्यरत होते. अनुशीलन समितीच्या गुप्त बैठकींना हजर राहत या समितीसाठी योगदान देत असल्याबद्दल कैद भोगत होते. लहानपणापासूनच घरातील क्रांतीचे पोषक वातावरण त्यांना मिळाले. राष्ट्रप्रेमाचे बाळकडू घेत आणि क्रांतीची बीजे मनात उचंबळून येत असतानाच राजेंद्र लाहिरी यांना वय वर्षे ९ झाले आणि वाराणसी येथे मामाच्या घरी शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यात आले. त्यांचे शिक्षण वाराणसी येथेच झाले. पुढील शिक्षणासाठी राजेंद्र लाहिरी बनारस येथील काशी विश्व हिंदू विद्यालयामध्ये इतिहास या विषयात एम. ए. करीत होते. याच ठिकाणी त्यांची शचींद्रनाथ सन्याल यांच्याशी मैत्री झाली. या मैत्रीमुळे लहानपणापासूनच असलेली मनातील क्रांतीज्योत प्रफ ुल्लित होऊन त्यांना हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशन या संघटनेशी स्वतःला जोडून घेता आले. राजेंद्र लाहिरी हे कॉलेजमध्ये अर्थशास्त्र व इतिहास याचे शिक्षण घेत असतानाच काशी हिंदू विश्वविद्यालयाच्या विद्यार्थी संघटनेचे सेक्रेटरी होते. तसेच बंगाल साहित्य परिषदेचे मानद सचिव होते. शचींद्रनाथ संन्याल यांनी राजेंद्र लाहिरी या युवकाच्या धगधगत्या देशप्रेमाची ओढ ओळखली होती. त्यांना विश्वास होता कि, राजेंद्र भारत देशासाठी असे काहीतरी करतील कि, इतिहास त्यांची ओळख कायम ठेवेल. काशी येथून प्रकाशित होणाऱ्या बंग वाणी या वृत्तपत्राचे संपादन कार्य शचींद्रनाथ यांनी राजेंद्र लाहिरी यांना सोपविले होते. हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशन या संघटनेमध्ये त्यांच्या भेटी निरनिराळ्या क्रांतिकारकांशी झाल्या.




काशी येथील हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशनचे प्रमुख म्हणून काम करीत असताना त्यांनी चारू, जवाहर, जुगल किशोर अशी वेगवेगळी नावे वापरून ही संघटना तरुणाच्या सहयोगाने भरभक्कम केली. त्यांना कायम असे वाटे कि, क्रांतीकारकांनी आपले विचार लिहिले पाहिजेत. ते आपले विचार बेधडक लिहीत आणि मांडीत असत. त्यांना बंगाल साहित्यामध्ये रुची होती. त्यांनी आपल्या आई बसंतकुमारी यांच्या स्मृती प्रित्यर्थ ग्रंथालय चालू केले होते.

जानेवारी १९२५ मध्ये हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशनच्या वतीने रिव्हॉल्यूशनरी या नावाचे पत्रक संपूर्ण हिंदुस्थानभर एका दिवशी वाटण्यात आले. या पत्रकाखाली बलराज अशी स्वाक्षरी होती. पण त्याचे खरे लेखक राजेंद्र लाहिरी यांचे गुरु शरदचंद्र संन्याल हे होते. या पत्रकाच्या सूत्रबद्ध प्रचाराने इंग्रज राजसत्तेला कल्पना येऊन तिची निद्रा खाडकन भंगली. असहयोग आंदोलनाच्या प्रारंभानंतर क्रांतीकारक आंदोलनाचा ज्वालामुखी कायमचा थंड पडला अशी त्यांची कल्पना होती. या पत्रकात असे म्हंटले होते कि, वर्तमान सोव्हिएट रशिया व प्राचीन भारतीय मंत्र द्रष्टे या दोघांपासूनही आम्ही आमच्या कार्याची प्रेरणा घेतली असून त्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालण्याचा आमचा कृतनिश्चय आहे. राज्यसत्तेने सूक्ष्मपणे शोध घेऊन शचींद्रनाथ संन्याल यांनी हे पत्र रासबिहारी बोस यांस जपानमध्ये पाठवले होते ते पत्र मध्येच पकडले आणि त्यांना अटक करण्यात आली. खटला भरण्यात येऊन त्यांना दोन वर्षाची शिक्षा देण्यात आली. तसेच योगेश चटर्जी यांनाही बंगाल ऑर्डिनन्सच्या तरतुदीखाली पकडण्यात आले. हिंदुस्थान रिपब्लीकन असोसिएशन या संघटनेचा नुसती ज्वलज्जहाल पत्रके काढणे येवढेच उद्दिष्ट नसून ज्वलजहाल कृत्ये करणे आणि ब्रिटिशांविरुद्ध लढण्यासाठी फंड गोळा करून शस्त्रसंग्रहाचे कार्य आरंभ करणे हा उद्देश होता. पण त्यासाठी आवश्यक तो धनसंचय मिळविण्यासाठी दरवडे घालणे हा एकच गार्ग उपलब्ध होता. यासाठी ९ मार्च १९२३, २५ डिसेंबर १९२४ आणि २४ मे १९२५ यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी बिचपुरी, बमशैली, व्दारकापूर येथे साहसपूर्ण दरवडे घालून पक्षाची नड भागविली.

(क्रमशः)

# सिताफळांचा मनसोक्त आस्वाद...!

ज्योतिर्मय साहित्य

ही गोष्ट सन १९७१ ते १९७३ या सालातील आहे. त्यावेळेस आम्ही उदगीर जिल्हा उस्मानाबाद येथे राहात होतो. आम्ही जिथे राहातं होतो ते घर म्हणजे निजामाच्या काळातील मोठा वाडा होता. तो हळीखेडे नावाच्या आमच्या घरमालकाने विकत घेतलेला होता. खाली भलेमोठे विस्तृत अंगण होते. त्याला लागूनच शेजारी एक दहा बाय पंधराची ओसरी होती. त्या ओसरीला चिटकूनच उजव्या व डाव्या बाजूला एक एक खोली होती. तसेच,

पहिल्या मजल्यावर एक भव्य दिवाणखान्या सारखा हॉल होता आणि त्याला लागूनच एक छोटी खोली होती. जिन्याने वरच्या मजल्यावर जाण्यासाठी मोठ्या दगडांच्या पायऱ्याचा जिना




केलेला होता. एवढ्या मोठया घराला दरमहा त्याकाळात वीस रुपये एवढे घरभाडे होते.

त्या काळात उदगीर तालुका असलेले छोटे शहर होते. उदगीर शहराच्या आसपासची खेडेगावे ही डोंगराळ भागात होती. त्यामुळे, रस्त्यांवर चढ, उतार खूप होते. उदगीरच्या शेजारीच एक तासाच्या अंतरावर नळगीर नावाचे गाव होते. त्या गावात लमाण लोकांची वस्ती जास्त प्रमाणात होती. त्या गावात आंब्याची आणि सिताफळांची शेकडों झाडे होती. तसेच, उदगीर हे बाजारपेठेचे शहर असल्याने नळगीर येथून लोक बाजार करण्यासाठी उदगीरला येत असत. नळगीर ते उदगीरचा रस्ता उंचसखल, डोंगराळ असल्यामुळे तेथील लोक बाजार करण्यासाठी आणि आंबे व सिताफळे विकण्यासाठी उंटावर माल ठेवून उंटावर बसून येत असत. त्यांच्या प्रवासाचा रस्ता आमच्या घरासमोरुनच जात होता. त्यामुळे, दिवसभरात पन्नास, पंचाहत्तर उंट तरी आम्हाला रोज पाहायला मिळत असत. नळगीर या गावातून लमाणी बायका वेताच्या मोठ्या टोपलीमध्ये, दोन तीनशे मोठी कच्ची सिताफळे टाकून उदगीरला विकायला येत असत. त्यांचा बाजाराचा रस्ता आमच्या घरावरुनच जात असे. त्या बायका सिताफळे विकण्यासाठी आमच्या वाड्यात आल्यानंतर आम्ही भाव ठरवून वीस ते पंचवीस रुपयांत ती सर्व सिताफळे विकत घेत असू. चार पाच दिवसात ती सर्व सिताफळे पिकून तयार होत असत. मग, आम्ही सर्व भावंडे मिळून प्रत्येकी रोज पाच सहा सिताफळे खात असत. मुख्य म्हणजे जिन्याच्या पायऱ्यांवर बसून मनमुरादपणे सिताफळांचा यथेच्छ आस्वाद घेत असत. तो फार सुखाचा आणि आनंदाचा काळ होता. गरीब असो की, श्रीमंत असो. सर्व फळांचा आस्वाद मनमुक्तपणे घेत असे.

त्या काळात आजच्या काळासारखा फसवेपणा अजिबात नसे. त्यामुळे, मुक्तपणे जो तो रसास्वाद घेत असे आणि रसास्वाद देत असे. आमच्या घरात एक मांजर होती. तिचं नाव आम्ही ''भोण्णा'' ठेवलं होतं. त्या काळात स्वयंपाकासाठी मातीची चुली असे. त्या चुलीवरच माझी आई दोन लिटर दूध स्टीलच्या पातेल्यात तापवायला ठेवत असे. भोण्णा चुलीशेजारींच बसलेली असे. थोडे डोळे उघडून ती दूधाकडे पाहात असे. पण, तिने कधीही दूधाला तोंड लावले नाही. ती व्याली की पिले थोडी मोठी झाली की, घरात ओसरीवर तीन चार पिले खेळत असत. मोठी बहीण नोकरी करीत असल्यामुळे

सकाळी आमच्या घरी लहान भाच्याला सोडून जात असे. त्यामुळे, दिवसभर खेळायला भाच्याला भोण्णाच्या पिलांचाच उद्योग असे.

दूसरे असे की, लमाणी बायका जेव्हा सिताफळे

विकायला आमच्या वाड्यात येत असत. तेव्हा पाच,दहा रुपयांत दोन तीनशे सिताफळे देवून जात असत. मांजराची पिले पाहिल्यावर मग, त्या म्हणायच्या आम्हाला दोन पिले द्या की, त्यामुळे, त्यांना पिले दिले की, त्या अजून पंचवीस पन्नास सिताफळे देवून जात असत.

आमचा रोज सिताफळे खाण्याचा हा उद्योग मग, उन्हाळ्यात दोन तीन महिने चालत असे. असे ते सोन्याचे दिवस होते. अमृतक्षणांचे, अमृतानंदाचे दिवस होते ते. त्या काळात माणसांमध्ये मग, ते कोणत्याही जाती वा धर्माचे असोत, त्यांच्यात माणुसकी आणि पाहुणचार मनात आणि हातात ओतप्रोत भरलेला असे. अत्यंत गरीबीतही लोक मनाने आणि दानधर्माने श्रीमंत होते. ''गेले ते दिन गेले''

हे खरे जीवन होते. त्या काळातील सुशिक्षित असो अथवा अशिक्षित असो जीवनाचा खरा अर्थ कळला होता. ''याला जीवन ऐसे नाव.''

***

# नाशवंत हा देह..

ज्योतिर्मय साहित्य

आपण जन्मतो त्या वेळी सगळेच जण निरागस असतो. जीवन प्रवाह वाहत राहतो आणि आपणा सर्वांनाच वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर उमजत जाते की हा देह नाशवंत आहे. आपणा सर्वांना आपला मृत्यू कधी, कशाने आणि कुठे होईल याची अजिबात कल्पना नसते पण एक दिवस आपले अचानक श्वास थांबणार आहेत आणि हा नाशवंत देह संपणार आहे याची जाणीव मात्र आतून प्रत्येकाला होते .

मला नेहमी वाटते जन्म, मृत्यू दोन्हीं आपल्या हातात नाही पण हा मधला प्रवास आणि जी आपल्याला विधात्याने दिलेली भूमिका आहे ती प्रामाणिकपणे, आनंदात, समाधानाने निभावणे हे आपल्याच हातात आहे ना? हा प्रवासही प्रत्येकाचा निरनिराळा, मधले थांबे वेगळे, रस्ते वेगळे काहींचे सरळ मलमली, काहींचे आडवळणांनी, दगड धोंड्याने भरलेले पण त्याचा शेवट हा नक्कीच असतो... पण या विनाशी देहाची वर्षे मोजण्यापेक्षा ती कशी सार्थकी लावता येईल हा विचार करायला हवा ना?

कवी सुधीर मोघे आयुष्याबद्दल लिहितात..

आयुष्य तुझे, वर्षात नको तू तोलू
ओंजळीत गळक्या, नको चिरंतन झेलू
हा देह विनाशी फक्त बदलते धाम
आयुष्य खरे तर, जन्मांचा मुक्काम

या विनाशी देहाला मुक्ती मिळविण्यासाठी अनेक जन्मांमधून जावे लागते त्यासाठी शक्य तितका पुण्य संचय करणे हे तर आपल्याच हाती असते ना? राग, लोभ, माया, मत्सर या आपल्या नैसर्गिक भावना आहेत. आपल्याला आयुष्य निरनिराळ्या अनुभवातून काय योग्य, अयोग्य आहे



हे शिकवत असते. निवड मात्र करणे आपल्या हाती असते. अकल्पितपणे आपल्या जीवन वाटेवर जीव नकोसा करून टाकणारी कठीण संकटेही येतात. हे जीवन या क्षणी संपावे असेही वाटणारे काही क्षण येतात. पण अशावेळी बहिणाबाई चौधरी काय म्हणतात बघा..

हास हास माझ्या जीवा असा संसारात हास
इडा पिडा संकटाच्या तोंडावऱ्हे काय फास
जग जग माझ्या जीवा असं जगणं तोलाच
उच्च गगनासारख, धरित्रीच्या रे मोलाच..

यामधील गर्भितार्थ लक्षात घेऊन जीवन शक्य तितक्या आनंदात घालवावे. आणि या आनंदयात्रेत अनेकांना सामील करून घेत जात मार्गक्रमण करावे.

अलीकडच्या काळात संपत्तीचा हव्यास आणि आभासी सुखाच्या मागे लागल्याने नातेसंबंधात प्रचंड दरी उत्पन्न होत असलेली दिसते. अगदी रक्तांच्या नात्यातही कित्येक ठिकाणी कोरडेपणा जाणवतो. त्यामुळे शक्य होईल तितके आपल्या प्रेमाच्या सिंचनाने सगळी नाती जपत जावीत..

समाजातील आर्थिक तफावत, सगळीकडे पसरत असलेले कटू राजकारण, काळाचा वेगात बदलत चाललेला आयाम त्यात अनेकांची होणारी फरपट हे सगळे थांबविणे आपल्या हातात नाही. पण जितकी आपली कुवत आहे तितक्या लोकांना आपण नक्कीच मदत करू शकतो, मार्ग दाखवू शकतो त्यांच्या जीवनात हिरवाई आणू शकतो हीच खरी उपासना म्हणणे योग्य होईल ना?

सगळ्याच साधू संतांची वचने नेहमीच आपल्याला मार्गदर्शन करत असतात. त्यांचा आदर्श घेऊन आपली वाटचाल चालू ठेवणे.. आणि या नाशवंत देहात न अडकणे हे आपल्याच हाती आहे.. शेवटी मला इतकेच म्हणावे वाटते..

नाशवंत हा देह जाण, क्षणिक हा खेळ सारा
नको चुकीचा हव्यास, कशास लोभाचा पसारा




# श्रीयश अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात पदवीदान समारंभाचे उत्साहात आयोजन

ज्योतिर्मय साहित्य
छत्रपती संभाजीनगर

– श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये बी.टेक. २०२३-२४ बॅच (डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणरे) आणि एम.बी.ए.- २०२३-२४ बॅच (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर) पदवीप्रदान समारंभ विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार दिमाखात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या प्रादेशिक कार्यालयाचे जॉईंट डायरेक्टर डॉ. किरण लाढाणे हे उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभियंता बसवराज मंगरुळे हे उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलन, सरस्वती वंदना आणि विद्यापीठ गीताने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील ह्यांनी प्रास्ताविक अभिभाषण केले. आपल्या मार्गदर्शनपर बीज भाषणात डॉ. लाढाणे म्हणाले, ''तंत्रज्ञान अतिशय वेगाने बदलत आहे. सध्या हे युग कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगचे आहे. या स्पर्धात्मक युगात यश मिळवण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाशी सातत्यानं संपर्कात राहणे आणि सतत कौशल्यवृद्धी करणे गरजेचे आहे.''

श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभियंता बसवराज मंगरुळे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, ''चिकाटी, परिश्रम आणि महत्त्वाकांक्षा ही यशाची त्रिसूत्री आहे. एक अभियंता कोणतेही मोठे उद्दिष्ट गाठण्याची क्षमता बाळगतो. विद्यार्थ्यांनी ही क्षमता ओळखून तिचा योग्य वापर करावा.''

या समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणरे येथील कंप्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स टेलिकम्युनिकेशन, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि सिव्हिल अभियांत्रिकी या शाखांमधील १३५ विद्यार्थ्यांना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील एम.बी.ए. विभागातील ४९ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाला श्रीयश अभियांत्रिकी व पॉलिटेक्निकचे प्राचार्य, श्रीयश मॅनेजमेंटचे संचालक, डीन अकॅडेमिक्स, सेंट्रल टी.पी.सी प्रमुख. विभागप्रमुख, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559